महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २३

# महाराजा सयाजीराव आणि दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद

डॉ. राजेंद्र मगर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २३

# महाराजा सयाजीराव
# आणि
# दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद

डॉ. राजेंद्र मगर

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद
इतिहास
डॉ. राजेंद्र मगर
●
प्रकाशन क्रमांक - ४३
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : डॉ. राजेंद्र मगर
संशोधन सहायक,
महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र
साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन,
औरंगाबाद - ९४२०३७८८५०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३१ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# आणि
# सर्वधर्मपरिषद

पहिली जागतिक सर्वधर्मपरिषद ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो शहरातील आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित केली होती. या परिषदेत स्वामी विवेकानंदांनी 'अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी भाषणाची केलेली सरुवात आणि त्यानंतर उपस्थित सात हजार जनसमुदायाने दोन मिनिटे टाळ्यांचा कडकडाट केला. जगाला सहिष्णुता आणि वैश्विकतेची शिकवण देणाऱ्या प्राचीन देशाचे प्रतिनिधित्व विवेकानंदांनी केले. विश्वातील प्राचीन हिंदू धर्माचे महत्त्व विशद करताना वेद आणि भारतातील संस्कृतीवर विशेष भर दिला. यावेळी विवेकानंदांनी जगातील सर्व धर्मांचे सारतत्त्व 'एकच' असल्याचे प्रतिपादन खासकरून केले. अल्पशा भाषणात उपस्थितांची मने जिंकली. हा सर्व घटनाक्रम भारतात नव्हे; तर भारताबाहेरही सुप्रसिद्ध आहे.

पण त्यानंतर दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद कधी-कोठे आयोजित केली? या परिषदेला भारतीयांचे प्रतिनिधित्व कोणी केले? भारतीयांतर्फे भाषण कोणी आणि कसे केले? याबद्दल

सर्वत्र अनभिज्ञता दिसते. याचा अधिक शोध घेतला असता धक्कादायक माहिती समोर येते. दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद त्यानंतर चाळीस वर्षांनी २७ व २८ ऑगस्ट १९३३ रोजी आयोजित केली गेली. या परिषदेचे अध्यक्ष महाराष्ट्रातील एका शेतकऱ्याचा सुपुत्र - आधुनिक भारताचे शिल्पकार बडोद्याचे नृपती महाराजा सयाजीराव गायकवाड होते. एखादा राजा सर्वधर्मपरिषदेचा अध्यक्ष होणे ही घटनाच सर्वांना आश्चर्यचकित करणारी आहे. त्यांना हा सन्मान एक सत्ताधीश म्हणून मिळाला की, सर्वधर्मांचा अभ्यासू अधिकारी पुरुष म्हणून मिळाला? अशी शंका प्रथमदर्शनी उपस्थित होते. यातील पहिली शक्यता विचारात घेतली असता प्रकर्षाने लक्षात येते की, सयाजीराव महाराज इंग्रजांचे मांडलिक राजा नसून मित्र होते. (लंडनच्या सुप्रीम कोर्टाने इ.स. १९१२ च्या एका खटल्यात सयाजीराव महाराज सार्वभौम राजा असल्याचा अंतरिम निकाल दिला होता.) इंग्रजांचा मित्र म्हणून सयाजीरावांना अध्यक्षस्थान दिले असे म्हणावे तर ही दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद इंग्रजांनी न भरवता अमेरिकेत आणि पुन्हा शिकागो शहरीच आयोजित केली होती. सयाजीराव महाराजांपेक्षा अधिक प्रबळ सत्ताधीश जगभर असल्याने इंग्रजांचे राज्य असलेल्या देशाचा किंवा इतर कोणत्याही देशांचा सत्ताधीश या सन्मानाचा मानकरी होऊ शकत होता. त्यामुळे सत्ताधीश म्हणून नक्कीच सयाजीराव महाराजांची निवड झाली नाही.

मग सयाजीराव महाराजांना सर्वधर्माचा अभ्यासू अधिकारी पुरुष म्हणून अध्यक्षस्थान मिळाले का? या दुसऱ्या शक्यतेकडे पाहिले असता पुन्हा काही प्रश्न आणि शंका निर्माण होतात. भारतासारख्या सनातन आणि परंपरावादी देशात सयाजीराव महाराजांनी सर्वधर्मांचा अभ्यास केला का? त्यानुसार आचरण केले? त्यांची सर्वधर्मांबद्दलची भूमिका काय होती? एक सत्ताधीश म्हणून सर्वधर्मांच्या अभ्यासासाठी काय-काय सोयी बडोदा राज्यात केल्या? सोयी केल्या तर त्याचे फलित काय? विद्यार्थ्यांना किंवा अभ्यासकांना स्वतःचा धर्म सोडून दुसऱ्या धर्माच्या अभ्यासाची सोय केली होती? धर्मअभ्यासासाठी किती विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी पाठवले होते? धर्मांचा तुलनात्मक अभ्यास स्वतः केला काय किंवा यासाठी बडोदा राज्यात काय केले? असे एक ना अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. या प्रश्नांचा सर्वंकष विचार करून त्यांच्या संपूर्ण जीवनचरित्राकडे चिकित्सकपणे पाहिल्यास अनेक सकारात्मक उत्तरे मिळतात.

सयाजीराव महाराज दत्तक विधानाने इ.स. १८७५ मध्ये गादीवर आले, तरी औपचारिक शिक्षणानंतर २८ डिसेंबर १८८१ मध्ये राज्यकारभार हाती आला. तेव्हापासून त्यांनी 'धर्मा'च्या अनुषंगाने काय-काय सुधारणा केल्या याचा विचार करावा लागेल. राज्यकारभार हाती येताच १८८२ मध्ये त्यांनी अस्पृश्य आणि आदिवासीयांचे बहुबल असणाऱ्या प्रांतांत प्रथम शाळा

सुरू केल्या. मोफत वसतिगृहे उभारली. या शाळांतून संपूर्ण फी माफी करत पाट्या, पुस्तके आणि इतर साधनेही मोफत दिली. पुढे इ.स. १८९२ मध्ये अमरेली प्रांतात आणि इ.स. १९०६ मध्ये संपूर्ण बडोदा राज्यात सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. परिणामस्वरूप शेकडा ९७ मुले शाळेत जाऊ लागली. पूर्वीपेक्षा शिक्षणाची स्थिती सुधारली. शिक्षणाअभावी पिढ्यानपिढ्या अंधश्रद्धा आणि चालीरीतींचा ओझ्याखाली दबलेल्या समाजाला ऊर्जितावस्था देण्यापासून कार्य करण्यास सुरुवात केली. पुढे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी माध्यमिक, उच्च आणि व्यावसायिक शिक्षणसुद्धा सर्वसामान्यांपर्यंत दारापर्यंत आणले. एकूणच प्रत्येक धर्मातील अविचाराने दबलेल्या प्रजेच्या उन्नतीसाठी कार्य सुरू केले. शिक्षणतज्ज्ञ जे.पी. नाईक यांच्या बडोद्यातील शिक्षणविषयक इ.स. १९४१च्या अहवालानुसार ब्रिटिश हिंदुस्थानच नव्हे; तर इतर संस्थानिकांपेक्षा बडोदा राज्यात शिक्षणाची स्थिती सर्वोत्कृष्ट होती. यांमुळे गरिबी, दारिद्र्याच्या निर्मूलनासाठी अडसर ठरणाऱ्या विचित्र चाली आपोआप बंद झाल्या. प्रजेचा आत्मसन्मान जागा झाला. महाराजांनी एकूणच मानवी उत्कर्षासाठी धर्मातील अडगळ ठरणाऱ्या बाबींना शिक्षणरूपाने तिलांजली दिली.

सयाजीराव महाराजांच्या संपूर्ण आयुष्यातील वैयक्तिक धर्माचरणाचा साकल्याने विचार केला असता एक बाब प्रामुख्याने लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे, महाराज वयाच्या

बारा वर्षांपर्यंत एका खेडेगावात होते. तिथे अस्पृश्यतेचे मोठे अवडंबर माजवले जात नव्हते. सर्व जातीधर्मातील मुले एकत्र खेळत होती. त्यांचे बंधू संपतराव गायकवाड यांच्या आठवणीवरून हे स्पष्ट होते. याचाच प्रभाव त्यांच्या जीवनावर राहिलेला दिसतो. महाराजांचे शिक्षण सुरू असताना वयाच्या १४-१५ व्या वर्षी अहमदाबाद मुक्कामी त्यांनी अस्पृशांच्या हॉटेलमध्ये जेवण घेतल्याची नोंद सापडते. त्यांचे औपचारिक शिक्षण सुरू असताना आणि पुढे त्यांनी गीता, वेद, रामायण आणि महाभारत आणि इतर धर्मग्रंथांचे वाचन मुळातून केले. त्यातील तपशील समजून घेतले. न समजणाऱ्या बाबी त्या-त्या विषयांतील जाणकार व्यक्तींकडून जाणून घेतल्या. राज्यकारभार हाती येताच राजवाड्यातील देवघर, त्यामधील पूजा आणि विधी यात सुधारणा केली. अनुष्ठान आणि दृष्ट काढण्यासारख्या धार्मिक विधींना पायबंद घातला. राजवाड्यातील खंडोबाचे मंदिर सर्वांसाठी खुले केले. धार्मिक विधींचा तपशील 'ऐनेराजमहाल' या ग्रंथात एकत्रित केला. बडोद्यातील दानधर्म आणि पुरोहितांना देण्यात येणारा दक्षिणा काही लाखांवर गेला होता. तो वडीलधाऱ्यांचा रोष न ओढवता टप्प्याटप्प्याने कमी केला. श्रावण महिन्यात देण्यात येणारी दक्षिणा परीक्षा घेऊन देण्यात येऊ लागल्याने त्याचे प्रमाण आपोआपच कमी झाले. परिणामस्वरूप राजवाड्यातील धार्मिक विधीबाबत असणारी कट्टरता कमी करण्यात त्यांना यश आले. तसेच धर्माच्या

नावाखाली भीती दाखवून केले जाणारे अवास्तव धार्मिक विधी बंद करून आर्थिक बचत केली. थोडक्यात, धर्मसुधारणेची सुरुवात स्वतःपासून केली.

सयाजीराव महाराजांनी इ.स. १८८७ मध्ये समुद्रपर्यटन केल्याने पुरोहितांनी प्रायश्चित्त घेण्यास भाग पाडले. वडीलधाऱ्या मंडळींच्या दबावामुळे विधी केला. पुढे त्यांनी २६ वेळा जगप्रवास केला; परंतु पुन्हा कधीही अशा विधींची पुनरावृत्ती होऊ दिली नाही. राजवाड्यातील सर्व विधी इ.स. १८९६ मध्ये वेदोक्त पद्धतींनी करण्यास सर्व पुरोहितांना भाग पाडले. यावेळी राजसत्ता विरुद्ध धर्मसत्ता हा वाद निर्माण होऊ पाहत होता; परंतु हा वाद कोणताही गाजावाजा न होता संपवला. नरहर कुरुंदकरांच्या शब्दांत सांगायचे झाले तर, 'सयाजीराव महाराजांनी वेदोक्त प्रकरण राजाप्रमाणे थाटात सोडवले.' हा वाद सोडवताना त्यांच्यासमोर दोन पर्याय होते. पहिला- हुकूम काढून, सत्तेचा वापर करून दंडुक-दडपशाहीने सर्व विधी करायला पुरोहितांना भाग पाडणे. दुसरा- पुरोहितांनी विधी करण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागितली होती. ती देऊन बिनबोभाट विधींची सुरुवात करणे. (लाच मागितल्याचे रियासतकार गो.स. सरदेसाई यांनी नोंदवून ठेवले आहे.) परंतु यापैकी एकाही मार्गाचा अवलंब न करता सर्व प्रकरणाचा मुळातून अभ्यास केला. पुरोहितांना वेदोक्त विधी का करणे गरजेचे आहे हे पटवून दिले. धर्म आणि विधी यांचा सखोल अभ्यास केला. सर्व पुरोहितांबरोबर स्वतंत्र

चर्चा करून यावर रीतसर मार्ग काढला. परिणामस्वरूप, सर्व पुरोहितांना सर्व विधी वेदोक्त पद्धतींनी करणे भाग पडले. यावेळी बडोदा आणि बडोद्याबाहेर अनेकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली; परंतु टीकेला उत्तर न देता प्रकरण महाराजांनी तडीस नेले. धर्मसुधारणेच्या कामी सयाजीराव महाराज स्वतःच्या प्रज्ञेचा स्वतंत्रपणे वापर करत होते.

सयाजीराव महाराज बोले तैसा चाले याचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांनी एक सत्ताधीश म्हणून समाजसुधारणेसाठी आणि धर्माच्या नावाखाली अनिष्ट चालींना बळी पडणाऱ्या प्रजेसाठी काय केले याचा विचार महत्त्वाचा ठरेल. त्यांना एक राज्यकर्ता म्हणून धर्म आणि सामाजिक सुधारणेसाठी पटापट कायदे करून, सत्तेच्या धाकाने सुधारणा करता येत होत्या; परंतु या सुधारणा दीर्घकालीन होतीलच याची शाश्वती नसते. महाराज लोकशाहीचे पालनकर्ता असल्याने कोणतीही सामाजिक सुधारणा करताना प्रजेचे मत विचारात घेत होते. केलेल्या कायद्यात कालानुरूप बदल करत होते. समाजसुधारणेसाठी किंबहुना धर्मातील अडगळ चाली बंद करण्यासाठी पुढील कायदे केले. सर्वप्रथम धर्मखात्याची स्थापना केली. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, अनेकपत्नीत्वनिषेध, जातिभेदनिवारण, पोटजातींतील विवाह, परदेशगमनाला मोकळीक, सहभोजन, अस्पृश्योद्धार, दारूबंदी यासाठी अनेक कायदे केले. त्याचबरोबर सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण (१८९२ आणि १९०६), वेदोक्त विधी

(१८९६), विधवा पुनर्विवाह (१९०१), धार्मिक स्वातंत्र्य (१९०१), बालविवाह प्रतिबंध (१९०४), सार्वजनिक दानधर्म (१९०५), हिंदू कोड बिल (१९०५), हिंदू विवाह (१९०५), परोपकारी संस्था (१९०७), विशेष विवाह कायदा (१९०८), हिंदू दत्तकविधान (१९१०), बालसंरक्षण (१९१२), पुरोहित (१९१५), वफ्फ (१९२७), हिंदू लग्नविच्छेद (१९३१), माता कल्याण (१९३२) ख्रिचन विवाह, हिंदू स्त्रियांना संपत्तीत हक्क, जाती छळ निर्मूलन, संन्यास दीक्षा-जैन, पारसी विवाह आणि घटस्फोट (१९३३), मागासवर्ग संरक्षण (१९३८), सामाजिक दुर्बलता निर्मूलन (१९३९), याचप्रमाणे सरकारी नोकरीत स्त्रियांना संरक्षण, सर्व जातींसाठी संस्कृत पाठशाला, एक गाव एक मंदिर (गावातील अनेक मंदिरांमुळे सामाजिक दरी निर्माण होते, त्याचे व्यवस्थापन व्यवस्थित होत नाही. गावातील सर्व जात-धर्मीयांनी एकत्रित यावे म्हणून गावात एकच मंदिर असावे असा महाराजांचा विचार होता.) असे अनेक कायदे केले. लोकांना कायद्याप्रमाणे मत आणि मन परिवर्तन करून आचरण करण्यास भाग पाडले, त्याप्रमाणे कायद्यांचे स्वतःही तितकेच काटेकोर पालन केले. परिणामस्वरूप बडोद्यातील सामाजिक विषमतेची दरी कमी होऊन सामाजस्वास्थ्य सुधारले. राज्यकर्ता सुधारक असल्याने त्यांना कायद्यानुसार अंमलबजावणी करता येत होती. नेमका हाच फरक इतर समाजसुधारक आणि सयाजीराव महाराजांमध्ये होता. समाजसुधारक फक्त सुधारणा करा म्हणून राज्यकर्त्यांकडे

मागणी करत होते; परंतु प्रत्यक्षात सुधारणेचे कायदे करून त्यानुसार अंमलबजावणी सयाजीराव महाराज करत होते.

सयाजीराव महाराजांचा जन्म हिंदू धर्मात झाला म्हणून त्यातीलच सुधारणांकडे त्यांचे लक्ष होते, असे म्हणणे एकांगी ठरेल. इतर धर्मांबाबत त्यांचे धोरण सहिष्णुतेचे होते. बौद्ध धर्माच्या उन्नतीमध्ये सयाजीराव महाराजांचा मोठा हातभार होता. धर्मानंद कोसंबींना पहिल्या भेटीत १६० रुपये दिले. इ.स. १९०८ ते इ.स. १९११ या कालावधीत बौद्धधर्माचा महाराष्ट्रात प्रसार आणि ग्रंथलेखनासाठी दरमहा ५० रु. शिष्यवृत्ती दिली. कोसबींची बौद्ध धर्मावरील पाच व्याख्याने बडोद्यात आयोजित केली. फर्ग्युसन महाविद्यालयात धर्मानंद कोसंबींच्या विनंतीनुसार पाली शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला पंधरा आणि दहा रुपयांच्या प्रत्येकी दोन शिष्यवृत्ती सुरू केल्या. इ.स. १९१० मधील आठव्या जगप्रवासात महाराज जपानमधील याकोहामा येथे पोहोचल्यावर कामाकुरा आणि इनोसिमा येथील बौद्ध मंदिरांना आणि बौद्ध गुफांना भेटी दिल्या. जपानच्या जुन्या राजधानीचे शहर किताओला (kioto) मधील विद्यापीठ आणि खासकरून बुद्धांची शिकवणूक देणाऱ्या शाळांना भेटी दिल्या. बौद्ध धर्माचे विश्वरूप समजून घेतले. परत येताच ज्युबिली बागेमध्ये जपानहून आणलेल्या गौतम बुद्धांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण केले. यावेळी ‘जेव्हा तुमची नजर या मूर्तीकडे जाईल, तेव्हा महात्मा बुद्धांचे उच्च गुण व विचार कसे होते, याचा विचार

करण्यास व त्यावरून बोध घेऊन सत्कर्म आचरण्यास शिका.' असे श्रोत्यांना सांगितले. डॉ. आनंदराव नायर यांनी मुंबईत बांधलेल्या बुद्धविहाराचे उद्घाटन केले. यावेळी भगवान गौतम, त्यांचा धर्म जगातील इतर धर्मांच्या तुलनेत कसा श्रेष्ठ आहे याचे विवेचन केले. इ.स. १९२४ मध्ये बौद्ध धर्माचे अभ्यासक 'पंडित बिनोयतोष भट्टाचार्य' यांना प्राच्यविद्या संस्थेच्या ओरियंटल सिरीजचे प्रमुख केले. काही दिवसांत संस्थेचे संचालक केले. त्यांच्या मदतीने बौद्ध धर्म प्रसाराचे काम फार पुढे गेले.

बडोदा राज्यात जैन धर्मीयांची लोकसंख्या इतरांच्या तुलनेत अत्यल्प होती. 'अहिंसा व जीवदया या तत्त्वांविषयीचा आदर या लोकांत आजही आढळतो' असे असले तरी जैन धर्मीयांतही अनेक गैरसमजुती असून, त्याशिवाय त्यांच्यात एका विशेष समजुतीचा पगडा तत्कालीन परिस्थितीत अधिक होता. तो म्हणजे 'संन्यासदीक्षा घेऊन यती झाल्याने मनुष्यास अधिक पुण्यप्राप्ती होते.' मूळ धर्माला फाटा देऊन अशा अनेक अज्ञानमूलक जाचक बाबी तयार करून, धर्माचा ठेका काही ढोंगी धर्मवीरांनी स्वतःकडे घेतला होता. याचा गैरफायदा घेत अज्ञानी प्रजेची पिळवणूक सुरू होती. जैन धर्मातील अनिष्ट बाबींना मूठमाती देण्यासाठी १ डिसेंबर १९०४ मध्ये जैन परिषदेचे आयोजन महाराजांनी केले. या परिषदेस उपस्थित राहून उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन केले. जैन धर्मात वडिलोपार्जित संपत्ती हडप करण्याच्या इराद्याने अनाथ बालकांना दीक्षा देऊन संन्यासी बनवले जात होते. अशी अनेक उदाहरणे

राजरोसपणे बडोदा राज्यात सुरू असल्याचे महाराजांच्या लक्षात आले. मुलांना अगदी बालपणीच देशोधडीस लावणारी जैन दीक्षा कायद्याने बंद करण्यापूर्वी धर्मशास्त्रात याचा आधार काय हे तपासण्यासाठी एक कमिटी नेमली. पुढे 'संन्यास दीक्षा निर्बंध' नावाने बडोदा राज्यात कायदा केला. या कायद्यानुसार कोणत्याही मुलाला दीक्षा देणे हे शासन-पात्र ठरवले गेले. यामुळे धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या गुंडगिरीला आणि धर्म ठेकेदारांना आपोआपच लगाम बसला.

इतर धर्माप्रमाणे इस्लाम धर्मात काही अनिष्ट बाबी घुसडवून अज्ञानी सामान्य जनतेची पिळवणूक चालली होती. यामध्ये महाराजांनी लक्ष घालून अंधश्रद्धा कायद्याने बंद केल्या. बडोदा सरकारमधून इस्लाम धर्मीयांसाठी दिलेल्या देणग्यांचा उपयोग सामान्यांसाठी पारदर्शीपणे होण्यासाठी वर उल्लेखलेला 'वक्फ कायदा' केला. त्यांनी धर्म आणि लोकभावना यांचा संयोग करताना कधीही धर्मगुरूंचा रोष पत्करला नाही. फक्त मंदिरे किंवा इतर धर्मीयांची प्रार्थनास्थळे बांधण्यासाठीच महाराजांनी मदत केली नाही; तर मुस्लिम प्रार्थनास्थळे नवीन उभारताना किंवा उद्धार करताना मोठमोठ्या देणग्या दिल्या. जानेवारी १९१३ मध्ये बडोदा येथील जुम्मा मशिदीसाठी धर्मार्थ देणगी ४५,००० रु. दिले. हे एक प्रातिनिधिक उदाहरण झाले. देशभरातील मुस्लिम समुदायांच्या महाविद्यालयांना भेटी देऊन सत्पात्री देणग्या दिल्या. कैरो येथील प्राच्यविद्या संस्थेचे प्रा. अर्थूर जेनिफ्री यांनी

संपादित केलेला कुराणातील ‘The Foreign Vocabulary of the Quran’ हा कोश ‘गायकवाड ओरियंटल माले’तून पुनर्प्रकाशित केला.

सयाजीराव महाराजांनी देशभरातील समकालीन समाजधुरीणांना मदत केली होती. अस्पृश्यता निर्मूलनासाठी आणि सामाजिक सुधारणेसाठी ज्या काही व्यक्तींनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले त्यामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदेचा अग्रक्रम आहे. शिंदेंना महाविद्यालयीन शिक्षणापासून महाराजांचे आर्थिक साहाय्य होते. ज्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन संस्थेकडून शिंदेंनी शिष्यवृत्ती घेतली, त्या संस्थेच्या स्थापनेपासून ते तहहयात आणि त्यानंतरही बडोद्यातून देणग्या दिल्या जात होत्या. शिंदेंना पुढे पदवी आणि एलएल. बी. साठी सयाजीराव महाराजांनी शिष्यवृत्ती दिली. ऑक्सफर्ड विद्यापीठातील तुलनात्मक धर्मअभ्यासाला जाण्यासाठी प्रवासखर्च दिला. उच्चशिक्षण घेऊन परतल्यावर (इ.स. १९०३) त्यांनी स्थापन केलेल्या शाळांना महाराजांनी राजाश्रय दिला.

इ.स. १९१० मध्ये धर्मानंद कोसंबींना हार्वर्ड विद्यापीठात प्रा. वारन यांना ‘विशुद्धीमार्गाचे संशोधन’ या ग्रंथाच्या संशोधनात सहकार्य करण्यासाठी बोलवण्यात आले, त्यावेळी महाराष्ट्रातील धर्मप्रसारासाठी बडोद्यातून शिष्यवृत्ती सुरू होती. तरीही हे काम वैश्विक समजून महाराजांनी त्यांना अमेरिकेत जाण्यास परवानगी दिली.

सयाजीराव महाराजांनी ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकरांना इ.स. १९०६ ते इ.स. १९१० या कालवधीत जाती (caste) वरील संशोधनासाठी शिष्यवृत्ती दिली. 'ऑफ कास्ट इन इंडिया' या प्रबंधाला अमेरिकेतील कोर्नेल विद्यापीठाने पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी जाहीर केली. पुढे या संशोधनाचा दुसरा भाग 'दि हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया' प्रकाशित झाला. भारतातील एका व्यक्तीने जातीवर केलेले पहिले संशोधन होते. हे संपूर्ण संशोधन महाराजांच्या मदतीमुळेच शक्य झाले. महाराजांच्या मदतीनेच ज्ञानकोशाचे खंडही सिद्ध केले.

सयाजीराव महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पदवी ते परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिल्याचे सर्वश्रुत आहे. डॉ. आंबेडकरांनी जून १९१६ मध्ये 'नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया-अ हिस्ट्रोरिकल अँड ॲनॅलिटिकल स्टडी' हा पीएच.डी. चा प्रबंध कोलंबिया विद्यापीठाला सदर केला. हे संशोधन सयाजीराव महाराजांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक सुधारणेचे, धर्म सुधारणेचे जे मूलगामी अनमोल काम पुढे केले, याचा पाया सयाजीराव महाराजांच्या दातृत्त्वात आहे. हे डॉ. आंबेडकरही प्रांजळपणे मान्य करतात. महाराजांनी डॉ. आंबेडकरांना शिक्षणानंतरही वेळोवेळी मदत केली.

महाराजांनी फक्त धर्मअभ्यासासाठी विद्यार्थ्यांना परदेशात पाठवले नाही तर, वेगवेगळ्या धर्मातील, जातीतील आणि पंथांतील गुणवान अधिकाऱ्यांची निवड केली. यामध्ये टी. माधवराव, अरविंद घोष, खासेराव जाधव, केशवराव देशपांडे, रमेशचंद्र दत्त, एफ.ए.एच. इलियट, काझी शहाबुद्दीन, श्रीनिवास राघव आय्यंगार, रामचंद्र धामणस्कर, केरशास्पजी दादाचनजी, सी. सेडन, व्ही.पी. माधवराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व्ही. टी. कृष्णम्माचारी अशा अनेकांना बडोद्यात आणून कार्योन्मुख केले. महाराजांच्या सर्वधर्मसमभावाचे हे एक प्रातिनिधिक उदाहरण सांगता येईल. धर्म-जातींपेक्षा महाराज अधिकाऱ्यांच्या गुणवत्तेला पर्यायाने प्रजेच्या उन्नतीला अधिक महत्त्व देत होते हे वरील उदाहरणावरून लक्षात येते.

तुलनात्मक धर्मअभ्यास हा सयाजीराव महाराजांचा आस्थेचा विषय होता. इ.स. १९०१ मध्ये विठ्ठल रामजी शिंदेंना तुलनात्मक धर्म अभ्यासासाठी परदेशात पाठवले. ही तुलनात्मक धर्म अभ्यासाची सुरुवात नसून तत्पूर्वीच्या महाराजांच्या भाषणातून आणि पत्रांतून याचा वारंवार उल्लेख आढळतो. पुढे १ ऑगस्ट १९१६ रोजी बडोदा महाविद्यालयात तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन सुरू केले. कोणतीही बाब सर्वोत्तम होण्यासाठी महाराजांची धडपड असे. याच धोरणानुसार अध्यासनाचे प्रमुख म्हणून केंब्रिज विद्यापीठातील ए.जे. विजेरी यांची नेमणूक केली. अध्यासन सुरू केल्यावर पहिल्याच

वर्षी हिंदू, मुस्लिम आणि बौद्ध धर्मांचा अभ्यास सुरू झाला. यामधून समोर आलेले संशोधन 'गायकवाड स्टडीज रिलीजन अँड फिलोसॉफी' यामालेतून प्रकाशित करण्यात येत होते. अध्यासनामार्फत हिंदू, इस्लाम, बौद्ध, शीख आणि इतर धर्मांवर चिंतन करून सतरा तुलनात्मक ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. याचे सामूहिक वाचन केले जाऊ लागले. हे ग्रंथ अभ्यासकांमार्फत सर्वसामान्य प्रजेपर्यंत पोहोचवले जात होते. तत्कालीन काळात तुलनात्मक धर्म अभ्यासाचे हिंदुस्थानातील एकमेव केंद्र म्हणून बडोद्याची ख्याती होती. जानेवारी १९३२ मध्ये अमेरिकेतील प्राध्यापक सौंडर्स (Saunders) यांच्या 'धर्मशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास आणि नीतिशास्त्र' हा ग्रंथ महाराजांच्या आश्रयाने प्रकाशित झाला.

सयाजीराव महाराज देशात किंवा परदेशात असताना नेहमीच आंतरराष्ट्रीय आणि नानाविध विषयांतील विद्वानांच्या संपर्कात असत. त्यांच्या भेटी स्वतः घेत. अनेक पुस्तकांचे वाचन करत. वीसहजार ग्रंथांचा संग्रह त्यांच्याजवळ होता. अनेक विषयांवर स्वतःच्या चिंतनाने भाष्य करत. 'फ्रॉम कैसर टू सुलतान', 'नोटस ऑन फॅमिन टूर' आणि 'गुडस आणि बॅडस' या ग्रंथाचे लेखन त्यांनी केले. अनेक विषयांवरील हजारो पत्रे, नानाविध विषयांवर तत्त्वज्ञानाच्या शैलीत केलेली शेकडो भाषणे, तत्कालीन ज्वलंत विषयांवरील लेख, (मागासवर्गाचे शिक्षण, पतित जाती आणि इतर) रोजनिशी आणि अनेक ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना

हे या प्रज्ञावंत राजाचे अक्षरधन आहे. महाराजांनी निर्मिलेल्या प्रचंड साहित्यात पोटजातीत रोटी-बेटी व्यवहार, ढोंगी संन्यासी आणि बाबालोकांना विरोध, जातीअंत, जातीयता, अस्पृश्यांचे शिक्षण, धर्मांतर, पडदा-गोषापद्धती, बालविवाह निषेध, विधवाविवाह प्रोत्साहन, वर्णवर्चस्ववादास विरोध, सतीप्रथा निषेध, अंधश्रद्धा विरोध, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समता, बंधुता, सत्पात्री दानधर्म, सामाजिक नीतिमत्ता, विविध धर्मग्रंथांवर भाष्य, अस्पृश्यता उद्धार, धर्मसुधारणा, चिकित्सक धर्मचिंतन, तुलनात्मक धर्मविचार आणि सद्धर्म संकल्पना यावर सुधारणेच्या आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून भाष्य आहे.

जागतिक पातळीवरील मान्यवरांनी महाराजांच्या विद्वत्तेबद्दल महनीय विधाने केली आहेत. सर्वप्रथम इ.स.१९०६ मध्ये त्यांनी अमेरिकेला भेट दिली. त्यावेळी लंडनमधील अमेरिकन वकील मि. व्हायट लॉ यांनी अमेरिकेतील ‘सेक्रेटरी ऑफ स्टेट’ यांना पत्रातून ‘महाराज हे फार बुद्धिमान राजे आहेत.’ असे मुद्दामहून कळवले होते. लुई ब्रुमफिल्ड या नामांकित साहित्यिकाने एका लेखात म्हटले, ‘बडोदा आणि भारत यांचे भाग्य आहे की, इतका भव्य व्यक्तिमत्त्व असलेला राजा त्यांना लाभला आहे. एवढा मोठा देशभक्त आणि इतका साधा माणूस.’ याचप्रमाणे स्टेनले राईस, ई.एल. तोतेनहॅम, अल्बन जी. विजेरी, रेव्ह. एडवर्ड विडन, फ्रॅंक डॉर्ट, ॲन्थनी एक्स. सोअर्स आदी मान्यवरांनी महाराजांच्या विद्वत्तेबद्दल महनीय विधाने केली आहेत. महाराज

प्रज्ञावंत आणि प्रगल्भ विचारांचे तत्त्वज्ञानी राजा असल्यामुळे त्यांची पुढील परिषदांच्या अध्यक्षपदी आणि उद्घाटक म्हणून निवड झाली. यामध्ये अ.भा. सामाजिक परिषद (१९१०), अ.भा. कॉंग्रेस अधिवेशनातील औद्योगिक प्रदर्शन (१९०६), महाराष्ट्र साहित्य परिषद (१९०६), अ.भा. मराठा शिक्षण परिषद (१९१०), अ.भा. आर्यसमाजाची परिषद, (१९११), अ.भा. संस्कृत परिषद (१९१५), अ.भा. संगीत परिषद (१९१६), अ.भा. मराठी साहित्य संमेलन (१९२१), जागतिक प्राच्यविद्या परिषद-सातवे (१९३३) पहिली जागतिक मानववंश परिषद, लंडन (१९११), अ.भा. अस्पृश्यता निवारण परिषद (१९१८), अ.भा. तत्त्वज्ञान परिषद (१९२७), अ.भा. मराठी साहित्य संमेलन (१९३२), पहिली जागतिक शांतता परिषद (१९३३), अ.भा. हिंदी साहित्य संमेलन (१९३४) अशा पंचवीस पेक्षा जास्त राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांचा समावेश होतो.

सयाजीराव महाराजांची कोणतीही सुधारणा भरीव पायावर उभा असे. त्यासाठी अनेक वर्षांची तपश्चर्या असे. परिणामस्वरूप, शाश्वत फलनिष्पत्ती होत असे. जाती-पंथ-सामाजिक आणि धर्मसुधारणा या केवळ व्याख्यानाने आणि हुकूम करून होत नाहीत याची महाराजांना कल्पना होती. त्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि आचरण महत्त्वाचे असते. कोणताही बदल दीर्घकाळ टिकायचा असेल तर त्यासाठी अनेक पिढ्यांना सुशिक्षण दिले पाहिजे या हेतूने लिखित स्वरूपाची सामग्री

आवश्यक असते. अगदी याच न्यायाने त्यांनी बडोद्यातील सार्वजनिक ग्रंथालये वृद्धिंगत केली. नानाविध विषयांवरील पुस्तके भारत आणि जगभरातील तज्ज्ञांकडून निर्माण करून घेतली. जगभरातील अनेक ग्रंथांचे देशी भाषेत अनुवाद करून घेतले. त्यात धर्मशास्त्र, तुलनात्मक धर्म अभ्यासाची पुस्तके कशी काय अपवाद राहतील? विविध साहित्यविषयक मालांतून वेगवेगळ्या धर्माविषयी बहात्तर ग्रंथ मराठीतून, चौसष्ट पेक्षा अधिक ग्रंथ गुजराथीतून प्रकाशित केले. या ग्रंथांना आजही पर्यायी ग्रंथ निर्माण झाले नाहीत. त्यांच्या कार्यकाळात बडोद्यातून जवळजवळ सतराशे ग्रंथ प्रकाशित झाले. ग्रंथ-प्रकाशन व्यवहाराबाबत समकालीन आणि त्यानंतरचा कोणताही सत्ताधीस त्यांची बरोबरी करू शकत नाही.

महाराज बाविसाव्या जगप्रवासात लंडनमध्ये असताना दुसऱ्या जागतिक सर्वधर्मपरिषदेच्या आयोजकांनी अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठी आग्रहाचे निमंत्रण दोनदा (ऑगस्ट १९३३चा पहिला आठवडा) दिले. आमंत्रण स्वीकारून महाराजांनी अमेरिकेकडे प्रयाण केले. त्यांना सर्वधर्मपरिषद आणि धर्मसंघपरिषद संयुक्त अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान देण्यात आला. अमेरिकेत पोहोचताच सरकारकडून महाराजांना मानाचा '२१ तोफांचा गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला. (हा सन्मान फक्त अमेरिकेचे अध्यक्ष आणि पूर्व अध्यक्ष यांनाच देण्यात येत असे.) २७ ऑगस्ट रोजी शिकागोमधील मॉरिसन हॉटेलच्या

एका मजल्यावरील भव्य दिवाणखान्यात संयुक्त अधिवेशन भरविण्यात आले होते. या वेळी भिन्न-भिन्न राष्ट्रांचे व धर्मांचे २६,००० प्रतिनिधी उपस्थित होते. सभागृहात महाराजांनी प्रवेश करताच हा अफाट श्रोतृसमाज उभा राहिला व सर्वांनी हिंदू पद्धतीने महाराजांना नमस्कार करून स्वागत केले.

महाराजांनी अध्यक्षस्थानावरून बोलताना. 'हा सन्मान माझा नसून माझ्या जन्मभूमीचा आहे.' हे प्रारंभीच नम्रपणे नमूद केले. त्यांनी तुलनात्मक धर्मअभ्यासाचे विद्यार्थी बनून अनेक मूळ धर्मग्रंथाचे परिशीलन केले होते. प्रत्येक धर्माची मूळ तत्त्वे आणि ढोंगी धर्मगुरूंनी केलेले सोयीस्कर बदल याचेही त्यांना आकलन होते. त्यामुळे सर्वधर्मांचे प्रतिनिधित्व करताना सांप्रतकाळी सर्व धर्मात परिवर्तन करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. धर्माची जीवनात गरज आहे; पण त्याचवेळी धर्म सुलभ न होता अडगळ ठरत असेल तर त्या धर्माची पुनर्घटना केली पाहिजे याचा साधार आणि जोरदार पुरस्कार या भाषणात केला. 'लोकसत्ता नष्ट करण्याची शक्ती जातीद्वेषात अजून आहे आणि वर्ण व्यवस्थेचा भलताच विपर्यास झाल्यामुळे हिंदुस्थानची अवनती झाली आहे.' अशी हिंदू धर्मावर टीका करताना हिंदू धर्माचे प्राचीनत्व आणि इतर धर्मांच्या तुलनेत असणारे श्रेष्ठत्वही सर्वांसमोर ठेवले. कोणत्याही सद्धर्माचे स्वरूप साधे आणि सरळ असले पाहिजे याचे प्रतिपादन करताना महाराज म्हणाले, 'सामान्य माणसाला आपल्या भाकरीप्रमाणे तो ओळखीचा वाटला पाहिजे.'

त्याकाळी आणि आजही धर्माचा संबंध गरिबीनिर्मूलनाशी जोडला जातो. सर्वधर्म परिषदेच्या जागतिक व्यासपीठावरून महाराजांनी हा प्रश्न उपस्थित केला. या भाषणात 'धर्माने गरिबांचे कैवारी व्हावे' असा उपदेश केला. महाराज पुढे म्हणाले, 'चालू काळातले आपल्या पुढचे अत्यंत महत्त्वाचे दोनच प्रश्न आहेत. 'देशा-देशांत शांतता राखणे आणि दुसरा बेकारीचे निवारण करणे. म्हणून लढाई, लोभ व कायदेशीर लूट यांच्या मुळाशी आणि दारिद्र्य व बेकारी यांच्या मुळाशी घाव घालण्याचे काम धर्म करू शकेल काय?' महाराजांनी या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केल्याचे दिसते. तसेच जगभरातील गरिबांसाठी धर्म किती महत्त्वाची भूमिका निभावू शकतो याचा ऊहापोह केला. कोणता धर्म श्रेष्ठ आणि कनिष्ठ या वादात न अडकता प्रत्येक धर्मातील अनिष्ठ बाबींचा शेवट करण्याची हीच वेळ असल्याचे उपस्थित मान्यवरांसमोर प्रतिपादन केले. 'भौतिकशास्त्रज्ञानी सध्या एका दृष्टीने जगाचे एकीकरण केले आहे खरे; पण सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या त्याचे तुकडे पडलेले आहेत; अशा स्थितीत धर्माला जगताचे आध्यात्मिक व सांस्कृतिक ऐक्य साधता येईल की नाही, हा सध्या मुख्य प्रश्न आहे.' महाराजांच्या या प्रश्नावर गेल्या सत्याऐंशी वर्षांत जगभरातील कोणत्याही देशात आणि धर्मात चर्चा झालेली दिसत नाही. आज जगभर झालेला आर्थिक विकास, औद्योगिकीकरण, उन्नती आणि भौतिक क्षेत्रात झालेल्या अमाप उन्नतीच्या पार्श्वभूमीवर कोणताही

जनसमुदाय या प्रश्नाला समाधानकारक उत्तर शोधू शकला नाही. यावर कोणत्याही धर्माने मार्ग काढला तर तो धर्म, देश, प्रांत मानवमुक्तीचा आदर्श ठरल्याशिवाय राहणार नाही.

धर्म कसा असावा? या प्रश्नांचे उत्तर देताना महाराजांनी मोठे मार्मिक आणि अभ्यासू विधान केले. ‘आपल्यामध्ये चळवळ असावी; पण जबरदस्ती नसावी, आपण पिकवावे, पण त्यावर मालकी हक्क गाजवू नये, इतरांना आपण मार्ग दाखवावा, पण त्याच्या नाकात वेसन घालू नये.’ त्यांची धर्माबाबत असणारी भूमिका इतकी सरळ, साधी आणि स्पष्ट होती. अमेरिकेतील तत्कालीन The Boston Globe, Chicago Tribune, The Windsor Star, The South Bend Tribune, The Minneapolis Star, The Eagle या महत्त्वाच्या वृत्तपत्रांनी महाराजांचे आगमन, २१ तोफांची सलामी, सर्वधर्मपरिषदेचे आयोजन आणि अध्यक्षीय भाषण यावर सविस्तर वृत्त आणि लेख प्रकाशित केले. हे मूळ इंग्रजी भाषण आणि मराठी अनुवाद महाराष्ट्र शासनाच्या ‘महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती’ ने प्रकाशित केला आहे. हे मुळातून वाचणे इष्ट ठरेल.

तत्कालीन कर्त्या लोकांमध्ये एकापेक्षा एक धर्मअभ्यासक भारतात-विदेशात होते; परंतु या सर्वांपेक्षा सयाजीरावांचे विचार आणि कार्य अनोखे होते. त्यांचा सर्वधर्मांचा अभ्यास तर होताच, त्याचबरोबर काळानुसार धर्मातील चांगल्या-वाईट बाबी

ओळखण्याची चिकित्सक दृष्टी त्यांच्यामध्ये होती. जगभरातील 'सर्व धर्मांचे सार एकच आहे' असे फक्त वरवर न सांगता त्या दृष्टीने तुलनात्मक सखोल अभ्यास करण्याची संधी स्वतः घेतली. इतरांना दिली. संशोधित नवनवीन माहिती, ज्ञान फक्त ग्रंथात न ठेवता त्याचे उपयोजन सर्वांपर्यंत जाण्यासाठी उपाययोजना केल्या. धर्माचे मूळ स्वरूप सर्वसामान्य लोकांना कळावे म्हणून पगारी (शासकीय) कीर्तनकार नेमले. सर्वधर्मांचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास, विविध धर्मांतील जाणकार व्यक्तींशी ठेवलेला सुसंवाद, सर्वधर्मीयांबाबत ठेवलेली सहिष्णुता, धर्मविचार, कार्य, धर्माचरण, जगभर पसरलेली प्रज्ञावंत राजा ही कीर्ती, विविध धर्मांचे परिशीलन आणि विद्वत्तेमुळे निर्माण झालेला धर्मविषयक अधिकार यांमुळे अध्यक्षपदी निवड होणे अपरिहार्य होते.

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com